पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003
दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


**प्रेस नोट** दिनांक :- १८/०१/२०२५

**गुळवंच, ता.सिन्नर परिसरात अवैधरित्या घातक अग्निशस्त्र बाळगणारे गुन्हेगारावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई - ०१ देशी बनावटीचे पिस्टल व जीवंत काडतुस हस्तगत**

---

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांनी आदेशीत केल्याप्रमाणे, जिल्हयातील अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन तसेच सराईत गुन्हेगारीस प्रतिबंध होण्यासाठी सत्वर कारवाई करण्यात येत आहे.

त्यानुसार आज दिनांक १८/०१/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार MIDC सिन्नर पोलीस ठाणे हद्दीत एक संशयीत इसम अवैधरित्या घातक अग्नीशस्त्रे बाळगुन काहीतरी गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरत असल्याची बातमी मिळाली. त्याप्रमाणे स्थागुशाचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुळवंच, ता.सिन्नर परिसरातुन संशयीत इसम नामे **राहुल तुळशीराम गुरकूले, वय २६, रा. दगडवाडी, गुळवंच, ता. सिन्नर, जि.नाशिक** यास ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमाची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात **०१ देशी बनावटीचे पिस्टल व ०१ जीवंत काडतूस** मिळून आले. सदर इसम हा विनापरवाना बेकादेशीररित्या घातक अग्नीशस्त्र कब्जात बाळगतांना मिळून आला असून त्यांचेविरुध्द MIDC सिन्नर पोलीस ठाणेस भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी राहुल गुरकुले याचेवर यापुर्वी MIDC सिन्नर पोलीस ठाणेस गंभीर दुखापत व म.पो. का.क. १२२ प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने व अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, सपोनि संदेश पवार, सपोउनि नवनाथ सानप, पोलीस अंमलदार विनोद टिळे, प्रकाश कासार, राहुल साळवे, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम यांचे पथकाने सदरची कारवाई केली आहे.